# प्रेसनोट

जा.क्र./ /२०१९ पुणे शहर, दिनांक १०/०७/२०१९

**विषय :- पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील दामिनी पथकाच्या ४ थ्या वर्धापनदिनाचे निमीत्ताने कार्यक्रम संपन्न झाले बाबत.**

---

पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील दामिनी पथकाचा आज दिनांक – १०/०७/२०१९ रोजी, ४ था. वर्धापन दिन असल्याने त्यानिमित्ताने मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे, सिने अभनेत्री/दिग्दशीका- मृणाल कुलकर्णी यांचे उपस्थित पोलीस आयुक्त कार्यालयातील कॉप्स एक्सलन्स हॉल या ठिकाणी कार्यक्रम संपन्न झाला.

सध्या दामिनी पथकामध्ये एकुण ३३ महिला कर्तव्यास असून त्या १ बीट मार्शल ही दोन पोलीस ठाणेंचे हद्दीत पेट्रोलिंग करीत आहे अशा एकुण १५ बीट मार्शल आहेत. आज रोजीचे कार्यक्रमात पीपीटीद्वारे दामिनी पथक सुरु झाल्यापासून केलेल्या उपक्रमांची माहिती दाखविण्यात आली, त्यामध्ये प्रामुख्याने, सार्वजनिक वाहनांमध्ये महिलांची होणारी छेडछाड प्रकारांना आळा बसविणे,खाजगी कंपनीत काम करणा-या महिलांना महिला अत्याचाराबाबतचे कायदे व महिला सुरक्षा याबाबत मार्गदर्शन,कॉलेजमधील मुलींना सेल्फ डिफेन्स बाबत मार्गदर्शन,शाळेतील मुला-मुलींना गुड टच बॅड टच बाबत दिलेली माहिती,मुलींना स्वसंरक्षणाबाबत मार्गदर्शन,हरविलेल्या मुलींचे नातेवाईक शोधून मुलीस त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले,पालखी बंदोबस्त दरम्यान गर्दीत महिलांचे दागिण्यांची चोरी रोखण्याकरीता बंदोबस्त व चोरी करणारे आरोपींना पकडले,फीट आलेल्या रिक्षा चालकास वेळीच केलेली मदत, मिळून आलेल्या अर्भकास वेळीच वैद्यकीय मदत मिळवून दिली,हरविले मौल्यवान साहित्यांची मुळ मालकास परत मिळवून दिले, आत्महत्या करणा-या महिलांना समुपदेशन केले तसेच महिलांचे सबंधीत गुन्हे उघडकीस आणण्यास मदत तसेच वाहतुकीचे नियमांची जनजागृती अशा केलेल्या कामगिरीची माहिती दाखविण्यात आली.

तसेच वेगवेगळ्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत गुन्हे उघडकीस आणण्यास व गुन्ह्यातील आरोपींस पकडण्याची उत्तम कामगिरी करणा-या ०७ महिला कर्मचारी यांचा मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर व सिने अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमास पोलीस सह आयुक्त,पुणे शहर श्री. डॉ. रविंद्र शिसवे,अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री. देशपांडे, सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे श्री बर्गे, पोलीस निरीक्षक –विजया कारंडे, सहा.पोलीस निरीक्षक स्वाती केदार, पोलीस उप निरीक्षक प्रिया टिळेकर असे उपस्थित होते.


महाराष्ट्र पोलीस
पुणे पोलीस आयुक्तालय
* दामिनी पथक * भरोसा सेल
स्थापना :- ८/७/२०१५
४ था वर्धापन दिन


पुणे पोलीस आयुक्तालय
* दामिनी पथक * भरोसा सेल
स्थापना :- ८/७/२०१५